ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-VI April 2013

# दृकश्राव्य साधनांची निर्मिती व शैक्षणिक महत्व

प्रा.श्री. पी.बी. वाघेरे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.

**प्रस्ताविक :**

अध्ययन–अध्यापन हे शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्वाचे अंग आहे. विशिष्ट वर्गास पाठ्यपुस्तकातील आशयाचे अध्यापन करतांना विविध संबोध, संकल्पना आणि प्रक्रिया विद्यार्थ्यांना स्पष्ट होण्यासाठी व त्यांचे आकल सुलभतेने होण्यासाठी परिसरातून शक्य तेवढे अनुभव देता येतात. कोणताही विषय शिकवितांना विद्यार्थ्यांना कंटाळवाणा वाटणार नाही यासाठी आपल्या अध्यापनात शिक्षकाने नवनवीन तंत्रांचा, कल्पनांचा वापर करणे गरजेचे आहे. म्हणून अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक साहित्याला फार महत्व प्राप्त झालेले आहे. आपल्या विषयात तज्ज्ञ असलेल्या शिक्षकाला देखील केवळ मौखिक अनुभावांमार्फत आपल्या आशयाचे / पाठ्यांशाचे उद्‌दिष्ट साध्य करणे अवघड जाते. डॉ. एडगर डेल यांनी केलेल्या संशोधनावरून प्रत्यक्ष हेतुपूर्ण अनुभव ही अध्ययन–अध्यापनाचा उत्कृष्ट पाठ आहे. यासाठी दृकश्राव्य साधनांची निर्मिती करून अध्यापनात त्यांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

**स्वरूप :**

अध्ययन–अध्यापन करण्यासाठी आपण ज्या विविध साधनांचा उपयोग करतो त्या दृकश्राव्य साधने म्हणतात. शिक्षकांना या विविध साधनांच्या योग्य निर्मितीमुळे व वापरामुळे अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया अधिक प्रभावी होवून शिक्षकाची गुणवत्ता वाढविण्यास व दर्जा सुधारण्यास मदत होते. शालेय स्तरावर प्रत्येक विषयाचे अध्यापन करतेवेळी ते विद्यार्थ्यांना आकलन होईलच असे नाही. इतिहास हा विषय अतिशय मनोरंजक व संस्काराच्या दृष्टीने परिणामकारक आहे. परंतु आज अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर असल्याने प्रत्येक पाठ्यांशास असणारी मूल्ये व संस्कार हे विद्यार्थ्यांमध्ये असतील असे नाही. त्याचे कारण आजकालची अध्यापन पद्धती निरूत्साही व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कंटाळवाणी असून शिक्षकाने या पद्धतीत बदल केला पाहिजे. त्यांनी नवनवीन तंत्राचा वापर केला पाहिजे. काही संबोध, संकल्पना व प्रक्रिया स्पष्ट होण्यासाठी दृकश्राव्य साधनांचा वापर केला पाहिजे. कारण इतिहास म्हटला की

भूतकालीन घटनांचा आढावाच घेतला जातो. इतिहासात काही गूढ अगम्य असते. इतिहास हे एक अवघड ओझेचं आहे असे काहींचे मत असते. परंतू या विषयाकडे बारकाईने बघितले तर हा विषय स्फूर्तिदायक, प्रेरणादायी, वीररस व चैतन्य निर्माण करणारा आहे. तसेच इतिहासाचे अध्यापन करणाऱ्यांना काहींना तो नीरस, रूक्ष व कंटाळवाणा वाटतो. या दृष्टीकोनातून दैनंदिन अध्यापन प्रभावी होण्यासाठी शैक्षणिक साधने व दृकश्राव्य साधने व विविध अध्यापन पद्धतींचा वापर करून दैंनदिन अध्यापनात बदल घडवून आणणे गरजेचे वाटते.

अध्ययन अध्यापन अर्थपूर्ण होण्यासाठी कल्कतेने तयार केलेले साहित्य योग्य वेळी व योग्य पद्धतीने वापरावे लागेल. विविध संबोध, संकल्पना वा प्रक्रिया या संबंधीची माहिती केवळ शब्द रूपाने देण्याऐवजी दृकश्राव्य साधनांचा वापर करून दिली तर विद्यार्थ्यांचे अध्ययन अर्थपूर्ण होते. शैक्षणिक साधनांच्या वापरामुळे विद्यार्थ्यांचा अध्यापनातील सहभाग वाढविता येतो व शिक्षक–विद्यार्थी–दृकश्राव्य साधनांमधील आंतरक्रिया प्रभावी व परिणामकारक होण्यास मदत होते. अध्यापन कार्यामध्ये या दृकश्राव्य साधनांचा वापर करावा लागणे अपरिहार्य आहे. त्यादृष्टीने शालेय स्तरावर दृकश्राव्य साधनांची निर्मिती, महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच त्याचा वापर कसा, केव्हा व किती प्रमाणात करावा याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रथम शिक्षकांना प्रशिक्षण देवून तद्नंतर प्रशिक्षणाद्वारे दृकश्राव्य साधनांची निर्मिती व वापर करता येतो.

### उद्दिष्टे:

1. पाठ्यांशानुसार /घटकानुसार दृकश्राव्य साधनांची निर्मिती करणे.
2. दृकश्राव्य साधनांच्या मदतीने अध्यापन कार्य प्रभावी करणे.
3. दृकश्राव्य साधनांचा अध्ययन–अध्यापनात प्रभावी व परिणामकारक वापर करता येणे.

### शैक्षणिक महत्त्व:

शैक्षणिक साधने हा अध्यापनातील महत्त्वाचा एक दुवा आहे. अध्यापनात वापरण्यात येणारी दृकश्राव्य साधने ही शिक्षकाचे अर्धेअधिक काम सुलभ करीत असतात. शिकविलेला पाठ आकलन होण्यासाठी, मनोरंजक होण्यासाठी पाठाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी शैक्षणिक साधनांची नितांत गरज आहे.

शाळेत शिक्षण देत असतांना ते ठराविक विषयांची माहिती देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक व शारीरिक सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी होतो. त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक न्याय उत्पादकता, आधुनिकीकरण नैतिक मूल्यांची जोपासना इत्यादी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकाने अध्यापन प्रक्रिया प्रभावी, मनोरंजक व प्रभावी केली पाहिजे. यासाठी विविध शैक्षणिक साधनांचा वापर केला पाहिजे.

**शैक्षणिक साहित्याचे प्रकार:**

**1. मुद्रित साहित्य :**

अभ्यासक्रम पुस्तिका, पाठयपुस्तके, शिक्षक हस्तपुस्तिका, शैक्षणिक मासिके व प्रकाशन संदर्भग्रंथ, ज्ञानकोश इ.

**2. दृकश्राव्य साधने:**

**अ) दृक साधने–**

**प्रक्षेपित साधने :**

स्थिर प्रक्षेषपक (स्लाईड प्रोजेक्टर, उर्ध्वशीर्ष प्रक्षेपक (ओव्हरहेड प्रोजेक्टर) अपारदर्शक चित्रप्रक्षेपक (एपिडायस्कोप) सूक्ष्मचित्र प्रक्षेपक, प्रोजेक्शन (मायक्रोस्कोप)

**अप्रक्षेपित साधने :**

खडू, फलक, कल्पफलक, (फ्लैनेलबोर्ड, खादी फलक) काच फलक, चुंबकीय फलक, तक्ते, नकाशे, भितीपत्रके, घडी पत्रके, त्रिमिती चित्रे, क्षणचित्रे, कोलाज, विज्ञान उपकरणे, प्रतिकृती, तरंगचित्रे इत्यादी.

**आ) श्राव्य साधने–**

रेडीओ, ध्वनिमुद्रक (टेपरेकॉर्डर) ध्वनिवर्धक (लाऊडस्पीकर)

**इ) दृकश्राव्य साधने–**

चित्रपट, दूरदर्शन संच, व्ही.सी.पी., व्ही.सी.आर, बाहुली नाटय इ.

अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक अनुभव देण्यासाठी डॉ. एडगर डेल यांनी सांगितल्याप्रमाणे पंच ज्ञानेंद्रियांचे साहचार्य असणे आवश्यक आहे. ज्ञानेंद्रियामार्फत डोळा–83%, कान–11%, त्वचा–3.5%, नाक–1.5%, जीभ–1.0%, इ. पंचंद्रियांमार्फत शिक्षण मिळत असते. अशा प्रकारे डोळा व कान या इंद्रियांद्वारे मिळणारे ज्ञान सर्वात जास्त असल्याने

दृकश्राव्य साधनांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. याकरिता शिक्षकांनी दृकश्राव्य साधनांच्या सर्व प्रकारची माहिती मिळवून दिलेल्या माहितीनुसार ती साधन निर्मिती करण्याचा प्रयत्न करावा व काही साधने ही विद्यार्थ्यांच्या मदतीने किंवा त्यांच्याकडून तयार करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अध्यापनात दृक साधनांचा वापर केला असता विद्यार्थ्यांच्या मनात पाठ्यांशाविषयी कल्पना निश्चित होवून त्याकडे डोळसपणे पाहण्याची सवय लागते व श्राव्य साधनांचा वापर केला तर चांगले ऐकण्याची सवय लागते.

श्रवण आणि मनन। बिजध्यासे समाधान
मिंध्या कल्पनेचे। भान उडोनी जाये।।

अशी रामदास स्वामींची ही शिकवण आपण कायम लक्षात ठेवण्ययाचा प्रयत्न केला पाहिजे.

दृकश्राव्य साधनांचा अध्यापनात उपयोग केला असता खालीलप्रमाणे फायदे होतात.

1. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व अर्थपूर्ण होते.
2. अध्यापनात नाविन्य निर्माण करता येते.
3. अध्यापनात कार्य प्रभावीपणे करता येते.
4. अध्ययन–अध्यापन आनंददायी होते.
5. अध्यापनात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविता येतो व अवधान टिकून राहते.
6. शैक्षणिक साधनांद्वारे दिलेली माहिती कायम स्वरूपी लक्षात राहते.
7. प्रभावी व प्रेरक म्हणून या साधनांचा उपयोग होतो.
8. कमी वेळेत अधिक ज्ञान देता येते म्हणजे **एक चित्र आणि हजार शब्द** हे सारखेच आहेत.
9. मूर्ताकडून–अमूर्ताकडे हे अध्यापन सूत्र वापरल्यामुळे संबोध, संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होतात.
10. दृकश्राव्य साधनांद्वारे **हे विश्वच माझे घर** या उंक्तीप्रमाणे **विश्वाचे अनुभव** आणि पर्यायाने अनुभवांचे विश्व वर्गात निर्माण करता येते.

**समारोप :**

शैक्षणिक साहित्याची इतिहासाच्या घटकानुसार निर्मिती केली तर आपले अध्यापन हे प्रभावी होत असते. इतिहास विषय शिकण्यास गोडी निर्माण होईल तसेच अध्यापनातील कंटाळा निघून जाईल अध्यापन हे आनंददायी होईल यात शंकाच नाही.